# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.06.2026** **वारःबुधवार**

---

1. भारताचे सर्वाधिक काळ पदभार सांभाळणारे निवडून आलेले पंतप्रधान बनल्याबद्दल जगभरातील नेत्यांकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन
2. सुरक्षित मातृत्व अभियानाच्या दशकपूर्तीनिमित्त दहा वर्षे-एक दशकाची काळजी राष्ट्रीय कार्यक्रमाची सुरुवात
3. गेल्या सहा वर्षांत सायबर-आधारित फसवणुकींमुळे भारतीयांचं 52 हजार 900 कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान आणि
4. पश्चिम आशियातील संघर्षामध्ये खोलवर न उतरण्याचा इराणचा अमेरिकेला इशारा

**<u>पंतप्रधान-जागतिक नेते</u>**

भारताचे सर्वाधिक काळ पदभार सांभाळणारे निवडून आलेले पंतप्रधान बनल्याबद्दल जागतिक नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे. पंतप्रधानांची परिवर्तनकारी शासनशैली, विकसनशील देशांचा त्यांनी केलेला पुरस्कार, सर्वसमावेशक आणि आर्थिकदृष्ट्या गतिमान भारताची त्यांची दूरदृष्टी, या गोष्टींची जागतिक नेत्यांनी प्रशंसा केली आहे. पंतप्रधान मोदींच्या दूरदृष्टीने भारताच्या सीमांपलीकडे, विशेषतः श्रीलंकेसह अनेक देशांमधील लोकांना प्रेरित केले आहे, असं श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके यांनी म्हटलं आहे. पापुआ न्यू गिनीचे पंतप्रधान जेम्स मारापे यांनी पंतप्रधान मोदींचे वर्णन एक आदर्श आणि नेतृत्वाचे उत्तम उदाहरण असं केलं आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत जागतिक मुद्द्यांवर एक प्रमुख आवाज म्हणून उदयास आला आहे, असं त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या पंतप्रधान कमला प्रसाद-बिसेसर यांनी नमूद केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला काल 12 वर्ष पूर्ण झाली. 2024 मध्ये याच दिवशी नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे, देशाचे सर्वाधिक काळ सलगपणे कार्यरत राहिलेले निवडून आलेले पंतप्रधान बनल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. हा ऐतिहासिक टप्पा केवळ पदावरील कालावधीचे मोजमाप नसून, देशाच्या विकासाच्या प्रवासातील एका परिवर्तनकारी युगाचे प्रतिबिंब आहे, असं त्यांनी म्हटलं आहे. गेल्या 12 वर्षांत त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वानं "सेवा हीच साधना" या भावनेतून सुशासनाची नवी व्याख्या घडवली आणि विकासाचा लाभ समाजातल्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवला, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. दरम्यान, गेल्या बारा वर्षांत देशातल्या महिला, युवा आणि शेतकऱ्यांना सक्षम करण्यात कोणतीही उणीव ठेवली नाही. विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सरकार सेवा, सुशासन आणि समृद्धीच्या मार्गावर अविरत वाटचाल करत राहील, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरील आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<u>शिवराजसिंह चौहान-जीरामजी</u>**

ग्रामीण विकासाला गती देणं आणि मजुरांना कोणत्याही अडथळ्याशिवाय रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं तयार करण्यात आलेल्या 'विकसित भारत जी-राम जी' कायद्याची अंमलबजावणी एक जुलैपासून होणार असून, केंद्र सरकारनं ग्रामीण विकासासाठी सव्वा लाख कोटी रुपयांच्या निधीची घोषणा केली आहे, असं केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं. 'विकसित भारत जी-राम जी'च्या अंमलबजावणीबाबत राज्य ग्रामीण विकास मंत्र्यांच्या दूरस्थ बैठकीत काल ते बोलत होते. केंद्र सरकारनं 'मनरेगा' अंतर्गत आधीच 30,000 कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे. याव्यतिरिक्त, राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना 95 हजार 692 कोटी रुपयांचा हंगामी निधी जारी करण्यात आला आहे. यामुळं एकूण निधी 1 लाख 25 हजार कोटी रुपयांच्या पुढे जाईल, असं चौहान यांनी सांगितलं. सरकारनं राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना या

कायद्याच्या अंमलबजावणीपूर्वी आवश्यक तयारी करण्यास सांगितले आहे, असं त्यांनी या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितलं. यासाठी 23 राज्यांनी अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे, तर झारखंड, कर्नाटक, तेलंगणा आणि मिझोराम यांनीही ही प्रक्रिया सुरू करण्याचं आश्वासन दिलं आहे.

**सुरक्षित मातृत्व अभियान**

पंतप्रधान सुरक्षित मातृत्व अभियानाला काल दहा वर्षे पूर्ण झाली. या महत्त्वपूर्ण टप्प्यानिमित्त आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयातर्फे "10 वर्षे-एक दशकाची काळजी" हा राष्ट्रीय कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. सुरक्षित गर्भारपण आणि निरोगी मातृत्व सुनिश्चित करण्याच्या उद्देशानं राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमाचं उद्घाटन केंद्रीय आरोग्यमंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली झालं. या योजनेअंतर्गत गर्भवती महिलांना मोफत आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवांचा लाभ अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

**धर्मेंद्र प्रधान**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या नवी दिल्लीतल्या मुख्यालयाला भेट देऊन 21 जूनला होणाऱ्या नीट यूजी फेरपरीक्षेच्या तयारीचा आढावा घेतला. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते पुढच्या सर्व प्रक्रियेपर्यंत सर्व कामांची तयारी अतिशय गोपनीयता ठेवून केली जात असून,परीक्षेचे पेपर आणि इतर साहित्य परीक्षा केंद्रांवर व्यवस्थितपणे पोहोचले याची खात्री केली  जात असल्याचं त्यांनी माध्यमांना सांगितलं. परीक्षेच्या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी केंद्र सरकार राज्य सरकारांशी समन्वय साधत आहे, सायबर सुरक्षेसाठी सीबीआय आणि आयबी या संस्था काळजी घेत आहेत, असं प्रधान यांनी सांगितलं.

**एनएचआरसी-बैठक**

गेल्या सहा वर्षांत सायबर-आधारित फसवणुकींमुळे भारतीयांचं 52 हजार 900 कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाल्याची माहिती राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती रामसुब्रमण्यन यांनी दिली आहे. यापैकी अंदाजे आठ टक्के नुकसान डिजिटल अटक घोटाळ्यांशी संबंधित आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाद्वारे काल नवी दिल्लीत 'डिजिटल अटक घोटाळ्यांविरुद्ध मानवाधिकारांचं संरक्षण' या विषयावरील खुल्या चर्चेमध्ये बोलताना न्यायमूर्ती व्ही. रामसुब्रमण्यन यांनी सायबर-आधारित फसवणुकींमुळं निर्माण होणाऱ्या वाढत्या धोक्याबद्दल चिंता व्यक्त केली आणि नागरिकांचे हक्क, प्रतिष्ठा आणि सुरक्षिततेवर त्याचे गंभीर परिणाम होत असल्याचं सांगितलं. सायबर गुन्हे रोखणं, पीडितांसाठी वसुली यंत्रणा सुधारणं आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांचा प्रतिसाद अधिक भक्कम करण्यासाठी व्यवहारिक उपाययोजना करण्याची गरज असल्याचं ते म्हणाले. वर्तमान कायदेशीर चौकटीअंतर्गत डिजिटल अटक घोटाळ्यांना एक स्वतंत्र गुन्हा म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव या चर्चेत सुचविण्यात आला.

**ट्रम्प-इराण-हेलिकॉप्टर**

पश्चिम आशियातील संघर्षामध्ये अमेरिकेनं अधिक खोलवर उतरु नये असा इशारा इराणनं दिला आहे. कोणत्याही हल्ल्याला किंवा धोक्याला इराणची सशस्त्र दलं चोख प्रत्युत्तर देतील. परदेशी सैन्याला सुरक्षित राहायचं असेल तर त्यांनी हा प्रदेश सोडून जावं असं आवाहन त्यांनी केलं. पर्शियन आखाताचा इतिहास पाहता, तिथं हस्तक्षेप करणाऱ्या बाह्य शक्तींना ज्या परिणामांना सामोरं जावं लागलं, ते लक्षात घ्यावं असंही अराघची म्हणाले.

ओमानच्या किनारपट्टीजवळ अमेरिकेच्या लष्करी 'अपाचे' हेलिकॉप्टर पाडल्याच्या घटनेला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकन सैन्यानं इराणवर हल्ले केले आहेत. इराणच्या एका ड्रोनने हे हेलिकॉप्टर पाडले होते आणि त्यातील दोन्ही वैमानिकांना सुरक्षितपणे वाचवण्यात आले. अमेरिकेचे हेलिकॉप्टर पाडल्याबद्दल इराणला दिलेले प्रत्युत्तर अत्यंत कठोर आणि प्रभावी असल्याचं राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. इराणनेही या भागातील अमेरिकन लक्ष्यांच्या दिशेने क्षेपणास्त्रं आणि ड्रोन डागली आहेत.

**हवामान बैठक**

जर्मनी इथं सुरू असलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या जून महिन्यातील हवामानविषयक बैठकीत, काल विद्युतीकरणाचे नवं जागतिक उद्दिष्ट जाहीर करण्यात आलं. संयुक्त राष्ट्रांच्या हवामान बदल परिषदेच्या म्हणजेच सीओपी 31 चे नियोजित अध्यक्ष मुरात कुरुम यांनी काल हे उद्दिष्ट जाहीर केलं. यामध्ये इमारती, परिवहन आणि उद्योग या क्षेत्रांमध्ये थेट जीवाश्म इंधनाचा वापर करण्याऐवजी स्वच्छ विजेचा वापर करण्याच्या प्रक्रियेला गती देण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**गोयल-जेनेट**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल दिल्लीत अर्नेस्ट आणि यंगच्या अध्यक्ष जेनेट ट्रंकले यांची भेट घेतली. या भेटीत जागतिक पुरवठा साखळीमध्ये भारताची वृद्धिंगत होणारी भूमिका, जागतिक क्षमता केंद्र क्षेत्रातील संधी तसंच गुंतवणूकीच्या विविध संधींवरही चर्चा झाल्याचं गोयल यांनी समाजमाध्यमावरील संदेशात नमूद केलं आहे.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर आजपासून बल्गेरिया आणि फिनलंडच्या दोन दिवसीय अधिकृत दौऱ्यावर जात आहेत. बल्गेरिया दौऱ्यादरम्यान डॉ. जयशंकर प्रमुखांशी आणि परराष्ट्र मंत्र्याशी चर्चा करतील. तर फिनलंडमध्ये डॉ. जयशंकर 'कुलतारंता टॉक्स'च्या 14 व्या आवृत्तीत सहभागी होतील.

**नायडू-वाराणसी विमानसेवा**

देशाच्या 'हब-अँड-स्पोक' हवाई वाहतूक संकल्पनेची सुरुवात वाराणसीपासून झाली असून, 'इझी कनेक्ट' विमानसेवा मॉडेलमध्ये समाविष्ट होणारे वाराणसी हे पहिले शहर आहे. त्यामुळं आता वाराणसीमुळे आंतरराष्ट्रीय प्रवाशांना दिल्लीला पोहोचण्यापूर्वीच इमिग्रेशन आणि बॅगेजची औपचारिकता पूर्ण करता येईल आणि जगभरातील विविध ठिकाणी अखंडपणे प्रवास करता येईल, असं नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी समाजमाध्यमावरील संदेशाद्वारे कळवलं आहे. भारताला जागतिक हवाई वाहतूक केंद्र बनवण्याच्या दिशेनं हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असंही नायडू यांनी म्हटलं आहे.

**जयपूर फटाका आग**

राजस्थानात जयपूर इथं खोह नागोरियन या रहिवासी भागात असलेल्या फटाक्यांच्या एका बेकायदेशीर गोदामात लागलेल्या आगीत सात जणांचा मृत्यू झाला. या सात जणांपैकी पाच जणांची ओळख पटली आहे. घटनेचा तपास सुरू असून, मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी या दुर्घटनेतील जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त केलं असून, जखमींवर योग्य उपचार केले जातील याची खात्री करण्याचे आदेश संबंधितांना दिले आहेत.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं बातमीपत्र संपलं, नमस्कार